

# सेनापती भोंसले





जयहिन्द प्रकाशमाला

# मातुश्री आणि पति-पत्नी



# सेनापति भोंसले

★

लेखक : गुं. फ. आजगांवकर

★

एकमेव विक्रेते

जय हिंद प्रकाशन : झावबाची वाडी : मुंबई २

पुष्प १८ वें ] संपादक : ग. का. रायकर [ मूल्य ४ आणे

| मुद्रक | प्रकाशक | चित्रकार |
| --- | --- | --- |
| र. रा. बखले | गुं. फ. आजगांवकर | रघुवीर |
| मुंबई वैभव | भाईजी वनजी लेन | मुळगांवकर |
| प्रेसः मुंबई नं. ४ | मुंबई २ | मुंबई नंबर ४ |

हिंदुस्थानांतील आणि हिंदुस्थानबाहेरील

**— आझाद हिंद सैनिकांस —**

भूक, तहान, यातना, सक्तीची चाल आणि मृत्यू यांखेरीज नेताजींनीं तुम्हाला कांहींही देऊं केलें नव्हतें. असें असतांही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं तुम्ही तुमच्या सर्वस्वाचा होम केलात. इंफालच्या मैदानावर, आराकानच्या जंगलांत तुम्ही गाजविलेलीं शूर कृत्यें आमच्या स्वातंत्र्य-लढ्याच्या इतिहासांत अमर राहातील. आपल्या राष्ट्राची इभ्रत आणि हिंदी योध्यांची सर्वोत्कृष्ठ परंपरा यांत तुमच्या बलिदानानें भरच पडली आहे. तुमच्या आवडत्या सेनापतीचें हें चरित्र तुमच्याशिवाय कोणाला अर्पण करूं?

**— गुं. फ. आजगांवकर —**

## आभार!

सेनापति जगन्नाथराव भोंसले यांचें विस्तृत चरित्र लिहिण्यासाठीं गेलें वर्षभर मी माहिती गोळा करीत होतों. परंतु माझे स्नेही द. बा. प्रभू, रा. शि. सामंत, रामचंद्र पंत, आणि धाकटे बंधु स. फ. आजगांवकर यांनीं आग्रहपूर्वक हें छोटें चरित्र माझ्याकडून लिहून घेतलें. महाराष्ट्रांतील बहुजनवर्गाला जगन्नाथरावांची तोंडओळख होण्यास या पुस्तकाचा निश्चित उपयोग होईल. माझे पूर्वाश्रमींचे गुरुजी प्रो० का. ह. केळकर, गजाननराव रेगे (रिटायर्ड डे. ए. इन्स्पेक्टर, प. खानदेश) आणि सुप्रसिद्ध साहित्तिक वि. कृ. नेरूरकर यांचें प्रोत्साहन मोलातीत आहे. जय हिंद प्रकाशनाचे मालक श्री. **ग. का. रायकर** यांनीं आपल्या जय हिंद प्रकाशमालेतर्फें अल्पावधींत हें पुस्तक काढलें याबद्दल त्यांना धन्यवाद!

३३६ भाईजीवनजी लेन
ठाकुरद्वारः मुंबई.

**गुं. फ. आजगांवकर**

# सेनापति भोंसले

## १ ● ● ● जय हिन्द !

मित्रहो ! महाराष्ट्राचा इतिहास तुमच्या वाचनांत आलाच आहे. शूर मराठा वीरांनीं आपल्या पराक्रमानें भूषविलेला हा महाराष्ट्र ! ह्या पराक्रमी महाराष्ट्रांत आपला जन्म झाला ही केवढी अभिमानाची गोष्ट ! महाराष्ट्राचें नांव घेतलें म्हणजे छत्रपति श्रीशिवाजी महाराजांची आठवण होते. घोरपडीच्या सहाय्यानें सिंहगडावर चढणाऱ्या पराक्रमी तानाजीला कोण विसरेल ? घोडखिंडींत हजारों वीरांना अडवून धरणाऱ्या बाजीप्रभूला कोण विसरेल ? महाराष्ट्राचा इतिहास वाचतांना मराठा वीरांच्या पराक्रमाच्या गोष्टींनीं तुम्हाला वेडें करून सोडल होतें. तुम्ही मनांत म्हणत असाल ह्या साऱ्या मागील काळच्या गोष्टी झाल्या. महाराष्ट्रांत आज एकादा पराक्रमी पुरुष कुठें आहे ?

मित्रहो, "कदम् कदम् बढाये जा। खुशीका गीत गायेजा" हें आझाद हिंद्सेनेचें गाणें तुम्हाला म्हणतां येतें. ही आझाद् सैनिकांची सेना कोणी उभारली ? ह्या सैनिकांनीं आपल्या देशासाठीं केवढा त्याग केला ! ह्या पराक्रमी सेनेचे महाराष्ट्रीय सेनापति जनरल जगन्नाथराव भोंसले यांची तुम्हाला माहिती आहे का ?

आज हिंदुस्थानांत आपल्या देशसेवेनें ज्यांचीं नांवें सर्वतोमुखीं झालीं आहेत अशा हिंदी पुढाऱ्यांत सेनापति जगन्नाथराव भोंसले यांची गणना होते.

★

# २ ● ● ● बाळपण व शिक्षण

सेनापति भोंसले यांचें जन्मगांव सावंतवाडी संस्थानांतील **तिरोडें.** तिरोडें गांवांत स्थायिक झाल्यापासून तिरोडकर भोंसले म्हणून ह्या घराण्याचा उल्लेख होऊं लागला. तिरोडकर भोंसल्यांची परंपरा तीनशें वर्षांपूर्वींपासून चालत आली आहे. मोठमोठे पराक्रमी पुरुष ह्या घराण्यांत होऊन गेले आहेत. पेशव्यांच्या कारकीर्दींत तळकोंकणच्या रक्षणाची जबाबदारी ह्याच घराण्यानें सांभाळली होती. अशा इतिहासप्रसिद्ध घराण्यांत सेनापति जगन्नाथरावांचा जन्म झाल्यामुळें साहस, शौर्य, रणांगणाची आवड, देशप्रीति इत्यादि मौलिक गुणांचा वारसा त्यांना जन्मजात लाभला आहे.

जनरल भोंसले यांचा जन्म २० एप्रिल १९०६ रोजीं तिरोडें येथें झाला. त्यांच्या वडिलांचें नांव **देवराव.** त्यांची आई **गंगाबाई,** ही जुन्या वळणाची स्त्री आहे. जनरल भोंसले यांचें पहिलें नांव कृष्णराव ठेवलें होतें. पुढें त्यांच्या निपुत्रिक चुलत्यानें त्यांना दत्तक घेतलें, आणि जगन्नाथ असें नांव ठेवलें. त्यांचें संपूर्ण नांव जगन्नाथराव कृष्णराव भोंसले असें आहे.

वयाच्या पांचव्या वर्षीं जगन्नाथराव तिरोडें येथील मराठी शाळेंत शिकूं लागले. मराठी चौथी पास होतांच इंग्रजी शिक्षणासाठीं त्यांना सावंतवाडी येथें कळसूलकर हायस्कूलमध्यें पाठविण्यांत आलें. कांहीं काल ते वेंगुर्लें येथील मिशनस्कूलमध्यें शिकत होते.

शाळेंत असतांना जगन्नाथरावांना खेळ खेळण्याची फार आवड होती. नेमून दिलेला अभ्यास करण्यांत ते कधींच टाळाटाळ करीत नसत. क्रिकेट

हा त्यांचा विशेष आवडीचा खेळ होता. "मी जगप्रसिद्ध क्रिकेटर होणार" असें ते आपल्या बालमित्रांना म्हणत असत.

माणसानें आलेली संधि गमावूं नये असें म्हणतात. थोर लोकांच्या या सांगण्यांत फार मोठा अर्थ आहे. आयुष्याला चांगलें वळण लावणारी संधि एकदांच येते. त्यावेळीं जो सावध राहील त्याचा भाग्योदय होतो. लष्करी शिक्षण घेण्याची अशीच संधि जगन्नाथरावांना मिळाली. श्रीमंत बापूसाहेब महाराजांनीं त्यांची शिफारस केली. घरांतील वडील माणसांनीं त्यांना आडकाठी केली नाहीं. लौकरच म्हणजे वयाच्या सोळाव्या वर्षी जगन्नाथराव डेहराडून येथील लष्करी कॉलेजांत दाखल झाले. ते सर्व विद्यार्थ्यांत वयानें लहान होते. आपल्या आवडत्या आईला सोडून एवढ्या लहान वयांत शेंकडो मैल दूर जाण्याचें जगन्नाथरावांना काय कारण होतें बरें ? केवळ लष्करी शिक्षण घेण्यासाठीं त्यांची ही धडपड होती. देशाची सुरक्षितता लष्करावर अवलंबून असते. यासाठींच खरा देशभक्त "मी माझ्या देशाचा सैनिक आहें" असें अभिमानानें म्हणतो.

डेहराडून येथ शिकत असतांना इ. स. १९२३ मध्यें जगन्नाथराव फार आजारी होते. आजारपणामुळें त्यांचा अभ्यास पुष्कळच मागें राहिला होता. पुढें प्रकृति सुधारतांच त्यांनीं अधिक उत्साहानें तिकडे लक्ष दिलें. त्यामुळें इतर मुलांच्या बरोबरीनें ते परीक्षा पास झाले.

१९२६ मध्यें डेहराडून येथील शिक्षण संपलें. आतां लौकरच आपली कुठेंतरी नेमणूक होणार म्हणून ते हुकुमाची वाट पहात होते; पण जो हुकूम आला तो निराळाच होता.

इंग्लंडमधील उच्च लष्करी शिक्षण देण्याची सोय असलेल्या "सँडहर्स्ट" कॉलेजमध्यें पाठवावयाच्या हुषार उमेद्वारांत त्यांचीही निवड झाली होती. अभ्यास असो अगर कसलेंही काम असो तें मन लावून करावयाचें हा

जगन्नाथरावांचा मूळपासून स्वभाव आहे. ह्या स्वभावामुळें त्यांना वरील मान मिळाला.

विलायतेस जाण्यापूर्वी दोन दिवस अगोदर खेळत असतांना त्यांच्या गुडघ्यावर हॉकी बसली. दुखावलेल्या पायावर औषधोपचार करावयाचा कीं नाहीं ? पण प्रवासाची तयारी करण्यांत गुंतल्यामुळें आपल्या गुडघ्या-कडे त्यांना लक्ष देतां आलें नाहीं. ह्या लहानशा चुकीचा त्यांना पुढें फार पश्चात्ताप करावा लागला. जखम, आजार आणि शत्रु यांच्याकडे कधींही दुर्लक्ष करूं नये असें ते आज म्हणतात.

बोटीवर चढल्यानंतर त्यांचा पाय सुजला. इंग्लंडच्या धक्क्याला जेव्हां बोट लागली तेव्हां वेदना सहन होत नाहींत म्हणून तळमळणाऱ्या जगन्नाथरावांची खाजगी हॉस्पिटलमध्यें रवानगी करण्यांत आली.

आपल्या नातलगांपासून...घरादारापासून...देशापासून हजारों मैल दूर एका हॉस्पिटलमध्यें खाटेवर झोंपलेले जगन्नाथराव तुम्ही तुमच्या दृष्टीसमोर आणा. पायाच्या वेदना सहन होत नाहींत म्हणून पंधरा दिवस आणि पंधरा रात्री त्यांना तळमळून काढाव्या लागल्या. अखेर एक दिवस डॉक्टरांनीं जगन्नाथरावांना सांगितलें कीं, तुमचा पाय कापून काढणें एवढाच इलाज शिल्लक राहिला आहे. जगन्नाथरावांच्या महत्त्वाकांक्षी मनावर तेव्हां केवढा आघात झाला असेल याची कल्पना करा. अशा वेळीं परमेश्वरावर भार टाकण्यापलीकडे कोण झाला तरी काय करणार ? जगन्नाथरावांनींहि तेंच केलें आणि गंमत अशी कीं, दुसऱ्या दिवसापासून त्यांच्या पायाला उतार पडूं लागला.

१९२६ ते १९२८ पर्यंत जगन्नाथराव इंग्लंडला होते. त्या ठिकाणीं आपल्या अभ्यासक्रमाबरोबरच परदेशी खेळांतही त्यांनीं प्रावीण्य संपादन केलें होतें. टेनीस, बॉक्सिंग, रॅकेटस्, क्रिकेट, फूटबॉल व हॉकी

इत्यादि अनेक परदेशी खेळ त्यांना उत्तम खेळतां येतात. त्यांची पहिली नेमणूक सेकंड लेफ्टनंट म्हणून केट्टयाला झाली. लौकरच एप्रिल महांत ते आपल्या गांवीं आईला भेटण्यासाठीं आले. पुष्कळ दिवसांनीं मुलगा भेटल्यामुळें त्यांच्या आईला एवढा आनंद झाला कीं बराच वेळपर्यंत तिला बोलतांही येत नव्हतें. तिचा कंठ भरून आला होता.

★

## ३ ● ● ● वीरकथा

१९२९ मध्यें बडोद्दा राजघराण्याचे निकटवर्ती अण्णासाहेब जगदाळे यांच्या थोरल्या मुलीबरोबर जगन्नाथरावांचा विवाह झाला. विवाह समारंभाला बडोद्याचे महाराज उपस्थित राहिले होते.

जगन्नाथरावांना शिकारीचा फार नाद होता. बेळगांवीं असतांना त्यांनीं एका जखमी वाघाला जमिनीवरून गोळी घातली होती. वाघ आणि ते यांच्यामध्यें अवघें आठ फुटांचें अंतर होतें. त्यावेळीं त्यांचा नेम चुकला असता तर जगन्नाथरावांच्या प्राणावर बेतलें असतें. त्यावेळीं त्यांच्याबरोबर त्यांचे धाकटे बंधु प्रतापराव हे होते.

जगन्नाथराव पोहण्यांत प्रवीण आहेत. १९३६ सालची गोष्ट! मलबार किनाऱ्यावर असलेल्या कॅनानूर गांवांतील एका हॉटलांत जगन्नाथरावांचा मुक्काम होता. नाताळचे दिवस असल्यामुळें अनेक युरोपियन लोकांचा जोडपीं आंघोळ करीत होतीं. त्यांपैकीं एक जोडपें प्रवाहांत सांपडून बुडूं लागलें. किनाऱ्यावर पुष्कळ लोक होते पण बुडणाऱ्या माणसांना काढावें कोणी? दुसऱ्याचे प्राण वांचविण्याच्या प्रयत्नांत स्वतःचे प्राण जाण्याचा प्रसंग !

जगन्नाथराव त्यावेळीं फिरण्यासाठीं बाहेर पडले होते. त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी सौ. चंद्रिकादेवी ह्याही होत्या. जगन्नाथरावांनीं त्या बुडणाऱ्या माणसांना पाहिलें मात्र, ते तीरासारखे धांवत गेले. जो शूर असतो तो प्रसंगाच्या वेळीं मागें राहात नाहीं. जगन्नाथरावांनीं त्या जोडप्याला किनाऱ्यापर्यंत सुखरूप आणलें. समुद्रांत उडी टाकण्यापूर्वी त्यांच्या पलटणचे कमांडिंग ऑफिसर कर्नल पियर्सन यांनीं त्यांना तीन वेळ, न जाण्याचा हुकूम दिला होता. परंतु मी जाणार असें उत्तर देऊन त्यांनीं पाण्यांत उडी घातली व त्या जोडप्याला वांचविलें.

जगन्नाथरावांच्या ह्या कामगिरीबद्दल इंग्लंडमधील 'रॉयल ह्युमेन सोसायटी' ह्या संस्थेनें त्यांना रौप्यपदक देऊन त्यांचा सत्कार केला. ह्या समारंभाकरितां बादशहांनीं त्यांना निमंत्रण दिलें होतें. एवढा मोठा बहुमान मिळविणारे जगन्नाथराव हे एकटेच हिंदुस्थानी गृहस्थ होत.

★

## ४ ● ● ● प्रवास

मे १९३७ मध्यें इंग्लंडचे बादशहा सहावे जॉर्ज यांच्या राज्यारोहण प्रसंगीं सबंध हिंदी फौजेच्या वतीनें जे तीन ऑफिसर्स निवडण्यांत आले होते त्यांत जगन्नाथराव भोंसले हे एक होते, ही महाराष्ट्रीयांना अभिमानाची गोष्ट आहे.

१९३७ मध्यें बडोद्याचे प्रतापसिंह महाराज जगप्रवासासाठीं निघाले. त्यांच्याबरोबर जगन्नाथरावहि एक वर्षाची रजा घेऊन गेले. जगांतील रशिया आणि चीन हे दोन देश सोडून युरोप, अमेरिका आणि आशिया

खंडांतील सर्व देशांतून त्यांनीं प्रवास केला आहे. प्रवासांत असतांना एकदां त्यांच्या प्राणावर बेतलें होतें. होनोलुलू बेटांवर मुक्काम असतांना ते पोहण्याकरतां समुद्रांत उतरले होते. पोहण्याच्या नादांत ते फार दूर गेले. येते वेळीं ते एवढे दमले कीं किनारा गांठणें त्यांना अशक्य झालें होतें. पण त्यांचा वेळ चांगला होता. ह्या प्रसंगांतून एका नीग्रो माणसाच्या मदतीमुळें ते बचावले. एका युरोपीयन जोडप्याला वांचविणाऱ्या जगन्नाथरावांना स्वतःचे प्राण वांचविण्यासाठीं एका नीग्रो माणसाची मदत घ्यावी लागली. ह्या प्रसंगावरून आपणाला पुष्कळच शिकतां येईल.

१ सप्टेंबर १९३९ मध्यें दुसऱ्या महायुद्धाला सुरवात झाली. फेब्रुआरी १९४० मध्यें लष्करी डावपेंचाच्या खास शिक्षणासाठीं जगन्नाथरावांना स्टाफ कॉलेज-क्वेट्टा येथें जावें लागलें. हें शिक्षण संपल्यावर त्यांना प्रत्यक्ष रणांगणावर जावयाचें होतें. म्हणून आठ दिवसांच्या रजेवर ते जन्मगांवीं आले.

जगन्नाथराव सावंतवाडीला आले तर आपल्या बालमित्रांना भेटल्या-शिवाय राहात नाहींत. सावंतवाडीला एक नंबरच्या मराठी शाळेंत "चौकेकर" ह्या आडनांवाचे एक मास्तर आहेत. सावंतवाडी शहरांतील सर्व लहान-थोरांना त्यांचें नांव परिचित आहे. शिक्षणाच्या धंद्यांत पडल्यामुळें त्यांच्या अंगच्या गुणांचें जसें चीज व्हावें तसें झालें नाहीं. हे चौकेकर मास्तर जगन्नाथरावांचे जिवलग मित्र ! आज एवढ्या मोठ्या योग्यतेला पोंचून सुद्धां जगन्नाथराव आपल्या या लंगोटीयार आणि गरीब मित्राला विसरले नाहींत.

१८ मे १९४१ ला जगन्ननाथराव एका खास बोटीनें मलायांत गेले. त्या ठिकाणीं हवाईदळ आणि पायदळ यांची पहाणी करणारे ते एक मोठे अधिकारी होते.

मलायामध्यें असतांना त्यांच्या वरिष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांचे ते अगदीं आवडते होते. जनरल सर लुई हीथ हा युरोपियन अधिकारी त्यांच्या कामावर खूष होता.

**कुवालालंपोर** येथें असतांना कांहीं युरोपियन हॉटेलांतून हिंदी लोकांना प्रवेश मिळत नाहीं असें त्यांना आढळून आलें. जगन्नाथरावांचा स्वभाव पडला स्वाभिमानी. त्यांनीं हिंदी अधिकाऱ्यांना एकत्र जमवून हिंदी लोकांचा अपमान आपण सहन करायचा नाहीं असें ठरविलें. पुढें जगन्नाथरावांच्या बाजूनें त्यांच्या तक्रारीचा निकाल लागला. स्वाभिमान हें आपलें खरें भांडवल. तेंच ज्यानें घालविलें तो देशसेवा काय करील ? स्वाभिमान आणि देशाभिमान हे सख्खे भाऊ आहेत ! एक आहे तेथें दुसरा आहे !!

६ डिसेंबर १९४१ ला 'जित्रा'च्या लष्करी ठाण्यावर जपानी फौजांनीं अकस्मात हल्ला चढविला. ब्रिटिश व हिंदी फौजांची तयारी कमी प्रतीची असल्यामुळें त्यांना माघार घ्यावी लागली. डिसेंबर अखेरी-पर्यंत त्यांची अशीच पळापळ चालली होती.

'जोहोरबारू' ह्या गांवीं असतांना त्यांच्या लष्करी ठाण्यावर जपानी विमानांनीं बॉंबस् टाकले. जगन्नाथराव राहात असलेला तंबू आंतील सामानासह जळून गेला. त्यांच्या जिवाला मात्र अपाय झाला नाहीं.

★

## ५ ● ● ● 'कर्नल' भोंसले

१० फेब्रुआरी १९४२ ला १८ व्या 'गडवाल रायफल'चे अधिकारी कर्नल स्मिथ धारातीर्थीं पडले. जगन्नाथरावांचे ते मित्र होते. पुढें ह्या अतिशय

जबाबदारीच्या जागेवर जगन्नाथरावांचीच नेमणूक करण्यांत आली. याच वेळीं त्यांना कर्नलचा हुद्दा देण्यांत आला. कॅप्टन्चे एकदम कर्नल होणारे जगन्नाथराव हे पहिलेच हिंदुस्थानी अधिकारी आहेत. त्यांच्या हाताखालीं युरोपियन अधिकारी काम करीत असत.

जपानी हल्ल्यांपुढें टिकाव लागेना तेव्हां इंग्रजांनीं शरणागति पत्करली. शरण जाण्यापूर्वीं अनेक इंग्रज अधिकारी लहान लहान बोटींत बसून हिंदुस्थानांत पळाले. जगन्नाथरावांनीं मात्र पळून जाण्याचें नाकारलें. ज्या ठिकाणीं माझे सैनिक त्या ठिकाणीं मी, असें त्यांनीं उत्तर दिलें. संकटाच्या-वेळीं जो मागें राहतो तो वीर नव्हे. जगन्नाथराव हे खरेखुरे वीर आणि सेनापति आहेत.

★

## ६ ● ● ● जपानांत

जपानच्या हातीं पडल्यावर जगन्नाथराव बरेच दिवस युद्धकैदीच होते. पुढें ते आझाद हिंद फौजेंत सामील झाले. "फील्ड फोर्स"चे कमांडर म्हणून त्यांना नेमण्यांत आलें होतें.

श्री. राशबिहारी बोस ह्या व्यक्तीचें नांव तुम्हाला ऐकून माहीत असेल. १९१२ सालीं लॉर्ड हार्डिंगच्या अंगावर बॉंब फेकण्याच्या प्रकारांत त्यांचा हात होता. त्यांचे मित्र पोलिसांच्या हातीं सांपडून फांसावर लटकले. श्री. राशबिहारींनी आपला वेष पालटला आणि ते जपानमध्यें गेले. आपल्या देशासाठीं प्रयत्न करणाऱ्या अशा कित्तेक देशभक्तांना देश-त्याग करावा लागला आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं पुष्कळांनीं आपले

प्राण अर्पण केले. ह्या थोर देशभक्तांची आपण नेहेमीं आठवण ठेवायला हवी.

श्री. राशबिहारी २५ वर्षें जपानमध्यें होते. त्या ठिकाणीं ते एक वर्तमानपत्र चालवीत. अनेक जपानी अधिकारी त्यांच्या परिचयाचे होते. डिसेंबर १९४१ ला युद्धाला सुरवात होण्यापूर्वीं श्री. राशबिहारी आणि जपानी सरकार यांच्यांत एक करार झाला होता. ह्या कराराप्रमाणें हिंदी स्वातंत्र्याला जपाननें मान्यता दिली होती. आणि हिंदी जनतेच्या वतीनें राशबिहारींनीं त्यांच्याकडे सहाय्य मागितलें होतें. जपानानें जिंकलेला प्रदेश आणि हिंदी सैनिक श्री. राशबिहारींच्या स्वाधीन करण्यांत आले. "इन्डियन् इन्डिपेन्डन्स् लीग" ह्या नांवाची एक हिंदी लोकांची संस्था त्यांनीं स्थापन केली. श्री. राशबिहारी तिचे अध्यक्ष झाले. त्यांच्या ताब्यांत देण्यांत आलेल्या युद्धकैद्यांत कॅ. मोहनसिंग या नांवाचा एक हिंदी अधिकारी होता.

कॅ० मोहनसिंगाच्या मदतीनें राशबिहारींनीं आझाद हिंद फौज उभारली. आझाद हिंद फौजेचा प्रमुख म्हणून मोहनसिंगची नेमणूक झाली होती.

मोहनसिंगचे एक सहकारी कर्नल गील ब्रिटिशांना फितूर असल्याच्या आरोपावरून पकडले गेले. मोहनसिंगचाही त्यांत हात होता. कोणत्याही क्षणीं त्याला अटक होण्याची शक्यता होती. मोहनसिंगनें आपणास अटक झाल्यावर फौजेनें कोणाचाही हुकूम मानूं नये असा हुकूम दिला. त्यांच्या हुकुमाप्रमाणें आझाद हिंद फौज तुटली गेली. ते सगळे सैनिक राशबिहारी आणि जपानी सरकार ह्या उभयतांवर चिडून गेले. खरी गोष्ट कोणालाच माहीत नव्हती. राशबिहारींनीं आपली फसवणूक केली असें हिंदी शिपायांना वाटत होतें.

★

# ७ • • • आझाद हिंद सेना

आझाद् हिंद् फौज पुन्हा उभी करण्यासाठीं श्री. राशबिहारींनीं भगीरथ प्रयत्न केले. परंतु त्या वृद्ध देशभक्ताच्या प्रयत्नाला यश आलें नाहीं. हें कार्य हातीं घ्यायला कोणीही पुढें सरेना. शेवटीं राशबिहारींनीं जगन्नाथ-रावांना बोलावलें. ते जगन्नाथरावांना म्हणाले, "भोंसले वंशांत तुमचा जन्म झाला आहे. तुमच्या पूवजांनीं स्वराज्य स्थापन केलें. स्वराज्याचें सुख अनुभवलें. हिंदी स्वातंत्र्यासाठीं लढणारी आझाद् हिंद् फौज उभी करणें हें तुमचें काम आहे. तुम्हीच ह्या सेनेचें नेतृत्व स्वीकारा." स्वतः होऊन पुढें सरण्याचा जगन्नाथरावांचा स्वभाव नाहीं. त्यांनीं एखादें काम हातीं घेतलें कीं मग मात्र तें शेवटाला नेल्याशिवाय ते राहायचे नाहींत.

दे. भ. राशबिहारींनीं स्थापन केलेल्या "मिलिटरी ब्यूरो" चे ते डिरेक्टर म्हणून निवडले गेले. प्रथम त्यांनीं सैनिकांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था चांगली केली. कामाचे तास कमी केले. कैद्यांना चांगली वागणूक मिळेल अशी व्यवस्था केली. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य संपादन करण्यासाठीं आझाद् हिंद् सेना उभी करणें जरूर आहे असा प्रचार चालू केला. थोड्या दिवसांनंतर सैनिकांचे दोन विभाग पाडले. एक आझाद् हिंद् सैन्यांत सामील होण्यास तयार होता. दुसरा विभाग कैदी म्हणून जगणेंच पसंत करीत होता. जगन्नाथरावांनीं कोणावर जबरदस्ती केली नाहीं. जे खुशीनें आले त्यांना शस्त्रें दिलीं. कवाईत सुरू केली.

नेताजी जर्मनीहून येण्यापूर्वीं आझाद् हिंद् सैनिकांची संख्या वीस हजारांवर गेली होती. जनरल भोंसले सर्वाधिकारी होते.

सुभाषचंद्र बोस जर्मनीला कसे गेले...वाटेंत त्यांना किती हालअपेष्टा

सहन कराव्या लागल्या...जर्मनींतून जपानला जाण्यासाठीं त्यांनीं पाण-बुडींतून कसा प्रवास केला वगैरे हकीगत प्रसिद्धच आहे. पाणबुडीचा प्रवास युद्धकालांत फार धोक्याचा असतो.

सुभाषचंद्र बोस ४ जुलै १९४३ मध्यें ' सिंगापूर ' येथें आले. आझाद हिंद सेनेचें हें प्रमुख ठाणें. विमानतळावर त्यांचें स्वागत करण्याचा पहिला मान जनरल जगन्नाथरावांना मिळाला. नंतर आझाद हिंद सैनिकांनीं त्यांना सलामी दिली. " नेताजी सुभाष " हा नवीनच निघालेला बोलपट तुम्ही न विसरतां पहा. नेताजींबरोबर प्रत्येक ठिकाणीं तुम्हाला जगन्नाथराव दिसतील. पूर्व आशिया आणि जपानी साम्राज्य यांत ज० भोंसले यांना नेताजीएवढाच मान होता. हिंदुस्थानच्या सीमेबाहेर महाराष्ट्रांतील मराठ्यांचें...भोंसले वंशाचें नांव गाजविणारे, जगन्नाथराव हे पहिलेच महाराष्ट्रीयन सेनापति आहेत.

सिंगापुरांत पोहोंचल्यावर राशबिहारींनीं आपल्या जागेवर सुभाषचंद्राची नेमणूक केली. जगन्नाथरावांनीं फौजेचे सर्वाधिकार त्यांच्या स्वाधीन केले, आणि त्यांच्या हाताखालची "चीफ् ऑफ् स्टाफ्" ची जागा स्वीकारली. जगन्नाथरावांना अधिकाराचा लोभ नव्हता. कार्याची तळमळ होती. अशा तऱ्हेनें सुभाषचंद्र बोस हे सर्वांचे नेते झाले. म्हणून ह्यावेळेपासून त्यांना "नेताजी " ह्या नांवानें संबोधण्यांत येऊं लागलें.

२१ ऑगष्ट १९४३ रोजीं नेताजींनीं हिंदुस्थानचें तात्पुरत सरकार स्थापन केलें. जगांतील अनेक राष्ट्रांनीं त्याला आपली मान्यता दिली होती. जगन्नाथराव लष्करी खात्याचे प्रमुख होते.

पूर्व आशियामध्यें सुमारें २५ लाख हिंदी लोकांची वस्ती आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची त्यांनाही तळमळ होती. आपल्या हातून काय होणार असें त्यांना वाटे. नेताजींनीं एक जाहीर दौरा काढला. त्यांनीं

केलेल्या भाषणाचा विलक्षण परिणाम झाला. आपलें घरदार, मुलें, पैसा, सर्व कांहीं हिंदुस्थानचें आहे असें त्या लोकांनीं त्यांना वचन दिलें. लोकांनीं आपल्याजवळचा सर्व पैसा नेताजींच्या स्वाधीन केला. बायकांनीं आपले दागदागिने दिले. बायका म्हणल्या "नेताजी आम्ही काय करावें तें सांगा." मुलें म्हणालीं, "नेताजी, आम्हालाही काम द्या!" नेताजींनीं सर्व मुलांना आणि स्त्रियांना सैनिकी शिक्षण घेण्याचा आदेश दिला. सैनिकी शिक्षण देण्याच्या छावण्या उघडण्यांत आल्या. हजारों मुलें खांद्यावर छोट्या बंदुका टाकून परेड करूं लागलीं. बालसेनेच्या पराक्रमाच्या गोष्टी आझाद हिंद सैनिक सांगतात; त्या ऐकतांना अंगावर रोमांच उभे राहतात. हीं मुलें पैसा गोळा करीत, गुप्त बातम्या देत, शाळा चालवीत, प्रचारकार्य करीत, जखमी सैनिकांना मदत करीत दोनदां जेवायचें आणि कामाला लागायचें असा त्यांचा क्रम होता. दोन वर्षें त्यांनीं रात्रंदिवस काम केलें.

आझाद हिंद फौजेनें शस्त्रें खालीं ठेवल्यानंतर आठ दिवसपर्यंत बाल-सेनेनें आपला तिरंगी झेंडा खालीं उतरला नव्हता. युरोपियन कॅप्टननें त्यांना बाजूला होण्याला सांगितलें. गोळ्या घालून ठार मारूं अशी धमकी दिली. बालसेनेच्या सोळा वर्षांच्या कॅप्टननें त्याला उत्तर दिलें. तो म्हणाला, "झेंडा उतरण्यापेक्षां आम्ही मरण पत्करूं!" पुढें जनरल भोंसले स्वतः आले. त्यांनीं त्यांची समजूत घातली. आझाद हिंद सेनेच्या सेनाप-तीनेंच ज्यावेळीं तो झेंडा खालीं उतरला, तेव्हां तीं मुलें जड मनानें निघून गेलीं. धन्य ती बालसेना.

हिंदी स्त्रियांच्या एका सभेला नेताजींना निमंत्रण होतें. भाषणाच्या वेळीं नेताजी म्हणाले कीं, प्रत्येक हिंदी स्त्री ही झांशीच्या लक्ष्मीप्रमाणें शूर बनली पाहिजे. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हिंदी स्त्रियांच्या जागृतीवरच अवलंबून आहे. ज्या देशांतील

स्त्रिया दुर्बल, भित्र्या, मागासलेल्या त्या देशाचा तरणोपाय नाहीं. नेताजींच्या भाषणाचा त्या स्त्रियांवर फार परिणाम झाला. "नेताजी, आम्हाला सैनिक व्हावयाचें आहे" असा त्यांनीं एकच गलका केला. नेताजींनीं त्यांची मागणी मान्य केली.

दुसऱ्या दिवशीं "राणी झांशी रेजिमेंट" उभारण्यांत आली. स्त्रियांची पलटण उभी करण्याचा पहिला मान हिंदुस्थाननें मिळविला. जगाच्या इतिहासांतील हें पहिलेंच उदाहरण. नेताजींनीं ही सगळी जबाबदारी जगन्नाथरावांवर टाकली. स्त्रिया रणांगणावर काय शौर्य गाजविणार असें जगन्नाथरावांना प्रथम वाटलें. लोकसुद्धां थट्टा करीत होते. पण पुढें त्यांची खात्री झाली.

ह्या स्त्री सैनिकांनीं ब्रम्हदेशाच्या आघाडीवर इंग्रजांना पाणी पाजलें होतें. जगन्नाथराव आज आत्माविश्वासानें सांगतात, स्त्रियांना सैनिकी शिक्षण देण्यांत राष्ट्राचा अधिक फायदा आहे. शूर आणि देशाभिमानी स्त्रियांकडून देशाची अधिक सेवा होते. मुलांना शौर्याचे धडे मिळं शकतात.

डिसेंबर १९४३ मध्यें जपानमध्यें "ईस्ट एशियाटिक कॉन्फरन्स" भरली होती. हिंदी राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून नेताजी आणि जनरल जगन्नाथराव गेले होते. टोकियोच्या विमानतळावर, जपानचे पंतप्रधान आपल्या मंत्रिमंडळासह स्वागतासाठीं आले होते. दहा हजार जपानी सैनिकांनीं त्यांना सलामी दिली. रस्त्याच्या दुतर्फा हजारों मुलें उभीं होतीं. त्यांच्या हातांत तिरंगी आणि जपानी झेंडे होते. मिरवणुकीची लांबी सुमारें चार मैल होती. हिंदी जनतेबद्दलच्या सदिच्छा जपानी राष्ट्र त्यावेळीं व्यक्त करीत होतें. आज हिंदुस्थान स्वतंत्र होत आहे. गुलामींत खितपत पडलेल्या जपानबद्दल आपण सहानुभूति व्यक्त करूंया. जगांत

कोणताही देश गुलाम नसावा अशी हिंदुस्थानची इच्छा आहे. गुलामीचें दुःख आम्ही भोगलें तेवढें पुरे.

जगन्नाथराव जपानमध्यें दोन महिने होते. त्यांचा मुक्काम इंपीरियल हॉटेलमध्यें होता. जपान हें राष्ट्र थोडक्या कालावधींत एवढें पुढें कसें आलें हें समजून घेण्याची त्यांना इच्छा होती. त्याकरतां जपानमधील कारखाने, शाळा, शहरें यांची त्यांनीं पाहाणी केली. कांहीं खेड्यांना भेटी दिल्या.

ते म्हणतात—जपानमध्यें मुलगा झाला कीं तो राष्ट्राचा असें मानलें जातें. मुलांना शिस्त लावण्यासाठीं मारावें लागत नाहीं. "तूं खरा जपानी नाहींस" असें म्हणणें म्हणजेच जपानी मुलाला मोठी शिक्षा होय. शाळेंत शिस्त अशा असते कीं, सैनिकांची एक पलटणच समोर आहे असें वाटावें. एकाचा डोळा किंवा मान इकडचा तिकडे होणार नाहीं. उत्कृष्ट शिस्त, निकोप शरीर प्रकृति, आज्ञाधारकपणा, बळकट मनोनिग्रह हीं जपानी वैशिष्ठ्यें आहेत.

नेताजींवर जपानी मुलांचें फार प्रेम होतें. नेताजींच्या भाषणासाठीं लाखों मुलें जमत. ते ज्या ज्या वेळीं जपानमध्यें जात, त्या त्या वेळीं मुलांच्या आग्रहामुळें खास मुलांसाठीं म्हणून त्यांचीं भाषणें होत. नेताजींचें भाषण सुरू झालें कीं मुलांचा एक समुद्रच समोर पसरला आहे असें वाटे. कुठें गडबड नाहीं. सगळीकडे शांत. नेताजींचा तेवढा शब्द ऐकूं यायचा. एका थोर देशभक्ताच्या तोंडचे ते शब्द होते. त्या शब्दांत एवढी जादू होती कीं, कोणालाही उठावेंसें वाटत नसे. जगन्नाथराव सांगतात "आम्हाला आझाद हिंद सेनेंत घ्या असा आग्रह धरणारीं मुलें मी पाहिलीं आहेत."

तुमच्या आवडत्या नेताजींवर जपानी मुलांचें केवढें हें प्रेम! थोर माणसांवर जगांतील सर्व मानवजातीचा सारखाच हक्क आहे.

जपानमध्यें रिकामा माणूस सांपडत नाहीं. जो तो आपआपल्या

उद्योगांत. प्रत्येकाच्या घरीं कसला ना कसला छोटा कारखाना असायचाच. ह्या लहान लहान उद्योगधंद्यांवर जपानानें जगाची बाजारपेठ काबीज केली आहे. जपानी माल फार स्वस्त असतो. जपानी लोक शिक्षणासाठीं, धंद्यांची माहिती घेण्यासाठीं–युरोप अमेरिकेंत जातात. आपल्या ज्ञानाचा फायदा आपल्या देशाला देतात. आपला देश जगांत पुढें आला पाहिजे म्हणून त्यांचे प्रयत्न सतत चालू असतात.

दे. भ. राशबिहारी त्यावेळीं फार आजारी होते. आझाद हिंद फौजेचे ते पहिले संस्थापक. जगन्नाथराव त्यांना भेटण्यासाठीं गेले. त्या वृद्ध देश-भक्ताला बिछान्यावरून उठण्याची शक्ति नव्हती. जगन्नाथरावांनीं त्यांच्याकडे आशीर्वाद मागितला. त्या थोर क्रांतिकारकानें त्यांना सांगितलें, "जनरल भोंसले, मी जिवंतपणीं हिंदुस्थानांत परतत नाहीं. निदान माझीं हाडें तरी हिंदुस्थानांत गेलेलीं तुम्ही पहा." त्यावेळीं जगन्नाथरावांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. १९४४ मध्यें हिंदुस्थानचा हा सुपुत्र निधन पावला. तो दिवस जपानी राष्ट्रानें आणि पूर्व आशियांतील हिंदी जनतेनें "शोक–दिन" म्हणून पाळला.

नेताजींनीं इंग्लंड अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारण्यापूर्वीं जनरल जगन्नाथरावांनीं बर्माफ्रंटवर न लढण्याचा त्यांना सल्ला दिला होता. जगन्नाथरावांचें म्हणणें अस होतें, कीं, तसें केल्यानें, ब्रिटिश वाटेल तेवढें सैन्य त्या ठिकाणीं आणूं शकतील. आझाद सैनिकांना दारूगोळ्याचा पुरवठा करणें जड जाईल. जगन्नाथरावांचें म्हणणें बरोबर होतें हें नेताजींना फार उशीरां समजलें. दळणवळणाची चांगली सोय नसल्यामुळें आझाद हिंद सैनिकांना रंगून पासून इंफालपर्यंत शेंकडों मैल पायीं प्रवास करावा लागला. पावसाळ्याच्या दिवसांत नद्यांना पूर आले, अन्नसामुग्री वाहून गेली, दारूगोळा निरुपयोगी झाला, नवा पुरवठा होणें कठीण झालें, आझाद हिंद सैनिकांचे अतोनात हाल झाले. पण धन्य ते

वीर! अशाही स्थितींत "चलो दिल्ली" अशी घोषणा करीत त्यांचें पाऊल पुढें पडत होतें.

ज. भोंसले सिंगापूरमध्यें होते. मार्च १९४४ मध्यें त्यांना बर्मामध्यें बोलविण्यांत आलें. सैन्याच्या हालचाली निर्णायक स्वरूपाला पोहोंचल्या होत्या. शत्रूंचा जोर वाढलेला होता. कामाच्या अतिरेकामुळें पुढें जगन्नाथराव आजारी पडले. लगेच त्यांना रंगूनच्या जनरल हॉस्पिटलमध्यें आणण्यांत आलें. शस्त्रक्रिया होईपर्यंत नेताजींच्या जिवांत जीव नव्हता. डॉ. बाईन हे ब्रम्ही गृहस्थ शस्त्रक्रिया करणार होते. ज० भोंसले त्यांना म्हणाले डॉक्टर, "मला दिल्लीला जायचें आहे हें विसरूं नका!"

"अशीच बळकट आशा धरा मग तुम्ही खात्रीनें दिल्लीला जाल!" डॉक्टर बाईननें उत्तर दिलें. रात्रीं बारा वाजतां नेताजी रंगूनला आले. त्यावेळीं जनरल भोंसले धयाळ स्थितींत होते.

कांहीं दिवस निघून गेले. जर्मनी माघार घेऊं लागला. हळूहळू जर्मनीचा पराभव झाला. जगांतील एक बलवान राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याला मुकलें. इंग्लंड अमेरिकेनें सुटकेचा श्वास सोडला. त्यांना आपलें लष्करी सामर्थ्य जपानच्या विरुद्ध उपयोगांत आणण्यास मिळालें. जपानला माघार घ्यावी लागली. आझाद हिंद सेनेलाही वाईट दिवस आले. नेताजींनीं त्यांना माघार घेण्याचा हुकूम दिला. सैनिक माघारी यायला नाखूष होते. आम्ही लढून मरूं अशी त्यांची प्रतिज्ञा होती.

हजारों सैनिकांनीं आपली प्रतिज्ञा खरी केली. ते मागें परतले नाहींत. इंफालच्या आघाडीवर त्यांनीं आपले देह ठेविले. त्या ठिकाणचे रक्ताचे डाग धुतले गेले नाहींत. 'चलो दिल्ली' ही त्यांची वीरघोषणा अजूनही विरली नाहीं. पशू–पक्षी, नदी–नाले, आझाद सैनिकांच्या पराक्रमाचीं

गाणीं अजूनही गातात. इंफाल आराकानची भूमी आम्हाला तीर्थक्षेत्रासारखी आहे. आझाद हिंद सैनिकांना आमचा शतशः प्रणाम !

★

## ८ • • नेताजींना निरोप

१९४५ मध्यें जगन्नाथराव ब्रम्हदेशांतून बँकॉकला जात होते. ही बातमी शत्रूंना समजली. आठ बाँबर विमानें त्यांच्यावर हल्ला करण्यासाठीं आलीं. जगन्नाथराव एका नदीमध्यें आंघोळ करीत होते. आजूबाजूला उघडी जागा होती. लपण्याला झाडी नव्हती. सैनिकांचा कँप दोन फर्लांगावर होता. विमानें आल्याबरोबर सर्वजण आश्रयाला पळाले. जगन्नाथरावांना पळण्याएवढा वेळ नव्हता. पन्नास फुटांपर्यंत खालीं येऊन वैमानिक मशिनगन चालवीत. मिनिटाला शेंकडो गोळ्या सुटत. गोळ्यांचा पाऊस पडे. जगन्नाथरावांचें डोकें दिसलें असतें तर ते खचीत वांचले नसते. त्यांनीं नदींतील हिरवा शेवाळ डोक्यावर माखला आणि अगदीं बिलकूल हालचाल न करतां ते पाण्यांत राहिले. प्रसंगावधान राखल्यामुळें ते अनेक जिवावरच्या प्रसंगांतून बचावले आहेत.

अॅटम बाँबचें नांव तुम्ही ऐकलें असेल. लहान अंड्याएवढा हा बाँब असतो. एखाद्या शहरावर पडला तर शहरच्या शहर भस्मसात होतें. लाखो लोक क्षणांत प्राणाला मुकतात. महिनेच्या महिने तो प्रदेश मनुष्यवस्तीला निरुपयोगी होतो. असा महाभयंकर बाँब अमेरिकेजवळ होता. तिनें तो 'हिरोशिमा' ह्या जपानी बेटावर टाकला. जपानी लोक मरायला तयार होते. शरण जाणें त्यांना पसंत नव्हतें. परंतु जपानच्या बादशहानें शरणांगतीचा निर्णय घेतला. ही बातमी समजतांच नेताजी घाईघाईनें टोकियोला जाण्या-

साठीं निघाले. जगन्नाथरावहि सोबत जाणार होते. आझाद सेनेच्या अधिकाऱ्यांना शस्त्रें खालीं ठेवून प्रसंगाला तयार राहण्याचा हुकूम देण्यांत आला होता. राजद्रोही म्हणून हे सैनिक फांसावर लटकणार होते.

बँकॉकच्या विमानतळावर एक विमान तयार ठेवण्यांत आल होतें. सभोंवतीं आझाद हिंद सेनेचे वरिष्ठ अधिकारीही उभे होते. नेताजी मोटारींतून येतांच सर्वांनीं सलामी दिली. ही अखेरची सलामी स्वीकारतांना नेताजींना काय वाटलें असेल कोण जाणे !

नेताजी विमानांत चढण्यापूर्वीं जगन्नाथरावांनीं दोन बंद पेट्या त्यांच्या स्वाधीन केल्या. ह्या दोन्ही पेट्यांमध्यें लाखों रुपयांचे हिऱ्यामोत्यांचे दागिने होते. नंतर जगन्नाथरावांनीं नेताजींना अभिवादन केलें आणि त्यांच्याबरोबर टोकियोला जाण्याचें आपण रहित केल्याचें, त्यांना सांगितलें. नेताजींना त्यांच्या ह्या वागणुकीमुळें फार आश्चर्य वाटलें. तेव्हां जगन्नाथराव त्यांना म्हणाले:—"आझाद हिंद वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं निघून जाणें अयोग्य आहे. सैनिकांच्या मनावर ह्याचा वाइट परिणाम होईल." नेताजींचें जाणें जरूरीचें असल्यामुळें मागें रहाण्याची जबाबदारी आपोआपच जगन्नाथरावांवर पडत होती. कर्तव्य पार पाडण्यासाठीं ते मागें राहिले. जगन्नाथरावांना आणि नेताजींना माहीत होतें कीं, राजद्रोहाच्या भयंकर आरोपाखालीं लष्करी कायद्याप्रमाणें मृत्यूची शिक्षा त्यांना मिळणार होती.

नेताजी त्यांच्याकडे वळून म्हणाले " जनरल भोंसले, आज तुमची मला खरी ओळख पटली." विमानांत बसतांना सोनेरी पॉकेट वॉच जगन्नाथरावांच्या हातीं देऊन नेताजी म्हणाले, " हिंदुस्थानांत गेल्यावर तुमच्या साह्याची मला गरज आहे. ही माझी आठवण ठेवा ! क्षणार्धांत विमानानें जमीन सोडली. नेताजी निघाले. पण कुठें.................................... ?

# ९ • • • अटक

तिसरे दिवशीं ब्रिटिश प्रतिनिधी ब्रिगेडियर लेन त्यांच्या कँपांत आला, आणि आझाद सैनिकांना दरडावून म्हणाला " भोंसले कुठें आहे ?" आझाद हिंद फौजेचा एक कारकून त्या ठिकाणीं होता. त्यानें तेवढ्याच मोठ्या आवाजानें त्याला सांगितलें " भोंसले नांवाचा कोणी येथें नाहीं. ज० भोंसले पाहिजे असतील तर आहेत पण त्यांची ह्यावेळीं भेट होणर नाहीं." मग संध्याकाळीं चार वाजतां ब्रिटिश कँपांत हजर होण्याबद्दलची चिठी ठेऊन तो निघून गेला.

संध्याकाळीं चार वाजतां ज. भोंसले ब्रिटिश छावणींत आले. त्यांनीं " फुल युनिफॉर्म " केलेला असल्यानें, ' आझाद हिंद फौजे ' चे ते 'चीफ् ऑफ् स्टाफ् ' आहेत हें कोणालाही ओळखतां येत होतें. त्यांच्याबरोबर त्यांच्या हाताखालचे अधिकारी गेले होते. ज. भोंसले यांचा सर्व इंग्रज ऑफिसर्सनीं उभें राहून सन्मान केला. नंतर त्यांना रीतसर शरण येण्याचा हुकूम करण्यांत आला. ज० भोंसले म्हणाले "आझाद हिंद फौज कोणालाच शरण जात नाहीं. हिंदुस्थान स्वतंत्र होईपर्यंत आमचा लढा संपणार नाहीं. तूर्त तुमचें सामर्थ्य अधिक आहे म्हणून हत्त्यारें खालीं ठेवीत आहोंत."

तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यानें शरणागतीच्या नऊ अटी पुढें केल्या. " हत्त्यारें ताब्यांत द्या " ही एकच अट त्यांनीं कबूल केली. इतर अटींना नकार देतांच त्यांना गोळी घालून ठार करूं अशी धमकी देण्यांत आली.

जनरल भोंसल्यांनीं त्यावर बाणेदारपणाचें उत्तर दिलें. ते म्हणाले, " डोळे उघडे ठेऊनच मी ' आय्. एन्. ए. ' मध्यें गेलों. तुमच्याप्रमाणेंच

मीसुद्धां अधिकारीच होतों. तुम्ही काय करूं शकतां तें समजावून सांगण्याची मला आवश्यकता नाहीं. तुम्हाला लढण्याची खुमखुमी असेल तर माझीहि तयारी आहे." नंतर त्यांना अटक करून फौजेचा ताबा घेण्यांत आला!

सप्टेंबर १९४५ मध्यें, त्यांना त्यांच्या स्वतःच्या बंगल्यावर गुरखा-गार्डमध्यें कैदेंत ठेवण्यांत आलें. "गुरखा" सैनिक हे नेपाळचे. 'नेपाळ' हा हिंदुस्थानच्या उत्तर सरहद्दीवर असलेला लहान पण स्वतंत्र असा देश आहे. लोकसंख्या आणि क्षेत्रफळ याचा विचार केला तर तो एका संस्थानाएवढा आहे. हे गुरखा सैनिक स्वतःला हिंदीच समजतात. शूर आणि प्रामाणिक अशी ही जात आहे.

जनरल भोंसले यांना अटक करण्यांत आल्याची बातमी तेथील बाल-सैनिकांना समजली. सुमारें वीस बालसैनिकांची एक तुकडी गुरखा सैनिकांचा पहारा पहात दूर उभी होती. डॉ. शर्मांचे दोन मुलगे त्या तुकडीचे प्रमुख होते. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या जनरल भोंसले सारख्या सेनापतीच्या बंगल्यासभोंतीं हिंदी सैनिकांनीं पहारा करावा याचें त्यांना फार दुःख झालें.

गुरखा सैनिकांचा अधिकारी गुरखाच होता. एका फितूर आणि देशद्रोही माणसावर आपण पहारा करतों आहों अशी त्याला घमेंड होती स्वतःला तो राजनिष्ठ समजत होता. पुन्हा पुन्हा तो आपल्या सैनिकांना काळजीपूर्वक काम करण्यास सांगत होता.

संध्याकाळीं ५ च्या सुमाराला तो अधिकारी, ब्रिटिश छावणींत जात होता. कांहीं अंतरावर गेल्यावर बालसैनिकांनीं त्याला घेरलें. प्रत्येक त्याला बोलत होता. "तं खरा हिंदी नाहींस. तूं देशद्रोही आहेस. इंग्रजांचे तुम्ही बगलबच्चे आहांत. भाकरीच्या

तुकड्यासाठीं तुम्ही तुमच्या भावांवरच हात उलचतां. कुत्रेसुद्धां तुमच्यापेक्षां बरे. जन्माला आल्याबरोबर तुम्ही कां नाहीं मेलां ? चारी बाजूंनीं धक्के, थुंकी, आणि अवहेलना यामुळें तो अधिकारी रडकुंडीस आला. नतंर त्यानें सर्वांची क्षमा मागितली आणि खरा इतिहास सांगण्यास सांगितलें. त्या मुलांकडून आझाद हिंद फौज, नेताजी, जनरल भोंसले, हे कोण, त्यांनीं काय कार्य केलें हें त्याला प्रथमच समजलें. मग तो अधिकारी मागें परतला. त्यानें ज० भोंसल्यांना 'जय हिंद' म्हणून सलामी दिली. पहारा करणाऱ्या सैनिकांस दूर फर्लांगाच्या अंतरावर उभें राहाण्यास सांगितलें. अखेर तो भोंसल्यांना म्हणाला, "जनरलसाहेब मला क्षमा करा ! तुम्ही वाटेल तो हुकूम करा त्याप्रमाणें मी वागेन."

बालसैनिकांचें हें धैर्य तुमच्या स्मरणांत कायमचें राहूंद्या !

कांहीं दिवसांनंतर जगन्नाथरावांना विमानानें दिल्लीला आणण्यांत आलें. त्यांना उतरून घेण्यासाठीं एक कार्पोरल आला होता. ते किल्ल्यांत पोंहोंचले तेव्हां आर्टिलरीच्या एका मेजरनें त्यांना त्यांचें सामान स्वतः उचलून आणण्यास सांगितलें. त्यावर जगन्नाथराव हे आझाद हिंद फौजेचे सेनापति होते हें कळतांच त्यानें माफी मागितली.

जगन्नथरावांना लाल किल्ल्यांत आणण्यांत आल्यावर त्यांच्या नातेवाई-कांना सरकारनें तसें कळविलें. वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन पत्नी सौ० चंद्रिकादेवी, मातोश्री गंगाबाई आणि बंधु प्रतापराव त्यांना भेटण्यासाठीं गेले. जगन्नाथरावांना त्या तशा अवस्थेंत पाहून त्यांच्या पत्नीला, आईला, आणि बंधूला काय वाटलें असेल त्याची तुम्हीच कल्पना करा.

★

ज० जगन्नाथरावांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना फांसावर लटकावणार हें अगदीं ठरल्यासारखेंच होतें. त्यांचे आप्तेष्ट, मित्र त्यांना भेटण्यास किंवा त्यांच्याबद्दल बोलण्यास धजत नव्हते. इंग्रज सरकारचा आपल्यावर रोष होईल अशी त्यांना भीति वाटत होती. पण अशाहि परिस्थितींत एका नामांकित संस्थानच्या अधिपतीनें त्यांना भेटून येण्याची हिम्मत दाखविली. बडोदा संस्थानचे श्रीमंत प्रतापसिंह महाराज हे जगन्नाथरावांना भेटण्यासाठीं लालकिल्ल्यांत गेले होते. जगन्नाथरावांनीं केलेल्या कार्याबद्दल त्यांनीं त्यांचा मुक्तकंठानें गौरव केला. खरा शूर असतो तो कधीं घाबरत नाहीं. खरा वीर असतो तो पराभवानें डरत नाहीं. श्रीमंत प्रतापसिंह महाराज इतर संस्थानिकांहून निराळे आहेत त्याचा हा पुरावा. जनरल भोंसले त्यांच्याबद्दल फार आदरानें बोलतात.

पंडीत जवाहरलाल नेहेरू, सरदार पटेल, महात्मा गांधी, यांच्या सारख्या पुढाऱ्यांनीं आझाद हिंद सैनिकांच्या सुटकेची मागणी केली. हिंदी जनतेनें त्याला फार मोठा पाठिंबा दिला. शेवटीं आझाद हिंद फौजेच्या अधिकाऱ्यांवर जाहीर खटले चालविण्याचा सरकारनें निर्णय घेतला. मुंबईचे प्रख्यात वकील आणि थोर देशभक्त कै० भुलाभाइ देसाई यांनीं आंतरराष्ट्रीय कायद्याचा कीस काढून असें सिद्ध केलें कीं, गुलाम देशांतील जनतेला आणि सैनिकांना, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं सशस्त्र युद्ध करण्याचा हक्क आहे. अखेरीस लोकमताचा अंदाज घेऊन, आझाद हिंद सैनिक आणि सेनाधिकारी यांची सुटका करण्यांत आली. ८ मे १९४६ ला जनरल भोंसले सहा महिन्यांचा कारागृहवास संपवून बाहेर पडले. हिंदी जनतेला त्यांच्या सुटकेनें आनंद होणें स्वभाविक

होतें. महाराष्ट्रांत जिकडे तिकडे आनंदीआनंद पसरला. ज० भोंसले यांच्या बादशाही स्वागताची तयारी करण्यांत आली.

ह्यापुढें जगन्नाथराव मुंबईला आले. त्यांच्या दर्शनासाठीं सहस्रावधि लोक जमा झाले होते. ठिकठिकाणीं त्यांचा सत्कार करण्यांत आला. लोकांच्या आग्रहासाठीं त्यांनीं सबंध महाराष्ट्रांतून दौरा काढला. लोकांनीं मानपत्रें आणि आझाद सैनिकांसाठीं मदत देऊन त्यांच्याबद्दलचें प्रेम व्यक्त केलें.

*

## ११ • • • गुणगौरव

जगन्नाथरावांच्या निकट सहवासांत गेल्याखेरीज त्यांच्या व्यक्तित्वाची ओळख होण्यासारखी नाहीं. उत्तम प्रकारच्या वक्तृत्वावर लाखों लोकांना मंत्रमुग्ध करण्याचें सामर्थ्य त्यांच्या वाणींत नाहीं. स्वतःच्या पराक्रमाच्या खऱ्याखोट्या गोष्टी लोकांच्या तोंडावर फेंकून त्यांचीं मनें आकर्षून घेणारांपैकीं जगन्नाथराव नाहींत. स्वतःच्या स्वार्थासाठीं लोकप्रियतेचा उपयोग करून घेऊन सत्तेचें राजकारण खेळण्याची त्यांना हौस नाहीं. कोणत्याही एका पक्षाला मिळून अगर त्याचें नेतृत्व पत्करून लोकांची दिशाभूल करणारांचा त्यांना मनापासून तिटकारा आहे. अशा स्थितींत पक्षातीत आणि तटस्थ रहाणाऱ्या जगन्नाथरावांची योग्यता कशी ठरवा-वयाची ? देशासाठीं त्यांनीं जें कांहीं केलें तें देशाबाहेर असतांना देशांतील लोकांना त्यांचें कार्य कसें समजणार ? जगन्नाथरावांच्या सत्कारसमारंभास हजर रहाणाऱ्या प्रत्येकाच्या मनापुढें एक प्रश्न

नेहेमीं उभा राही तो हा कीं, नेताजींच्या खालोखाल आझाद सेनेचे जे अधिकारी होते ते जनरल भोंसले हेच काय ? आश्चर्य आहे !

अशा तऱ्हेचे उद्गार काढणोरे लोक कुठेतरी चुकत असले पाहिजेत किंवा जनरल भोंसले यांच्या हातून लोक समजतात तसें कार्य घडलें नाहीं असें म्हटलें पाहिजे. परंतु उपलब्ध पुरावा आणि प्रसिद्ध झालेला इतिहास लक्षांत घेतां जगन्नाथरावांची कर्तबगारी निर्विवादपणें सिद्ध होते.

ही जुनी गोष्ट आहे. एका चिनी प्रोफेसरानें आपल्या लहान मुलाला गोष्ट सांगतांना, जपानमधील प्रख्यात फुजी नांवाच्या ज्वालामुखी पर्वताचें महाभयंकर वर्णन केलें. एक वर्षानंतर तो प्रोफेसर आपल्या कुटुंबासह जपानमधील मित्राकडे सुटीचे दिवस घालविण्यासाठीं गेला. दुसऱ्या दिवशीं यात्रा असल्यामुळें दोन मैलांवरील एका पर्वताच्या पायथ्याशीं ती सर्व मंडळी आली. मुलानें बापाला विचारलें, बाबा ह्या सुंदर पर्वताचें नांव काय ?

ह्याला फुजी पर्वत म्हणतात ! जपानी मित्रानें उत्तर दिलें.

वरील शब्द ऐकतांच तो मुलगा मोठ्या दुःखानें म्हणाला, "बाबा, मला वाटलें नव्हतें कीं तुम्ही असें खोटें बोलाल. ह्या पर्वताचें तुम्ही किती भयंकर वर्णन केलें होते." मुलाला जवळ घेऊन बाप म्हणाला "माझ्या आवडत्या मुला, माझ्यावर विश्वास ठेव. ह्या पर्वताचें खरें स्वरूप तुला पुढें केव्हांतरी कळेल."

हें उदाहरण घेण्याचें कारण, पाहाणाराला सामान्य आणि प्रकृतिनें थंड दिसणाऱ्या जगन्नाथरावांची योग्यता त्यांच्या अंगांतील अदृश्य सामर्थ्यावर आहे. पावरहाऊसमध्यें सांठवून ठेवलेल्या विजेच्या शक्तीची सामान्य जनांना कल्पना केव्हां येते ? ती कार्याला लावावी तेव्हां ! शेंकडों कारखान्यांचीं यंत्रें चालू लागलीं आणि सहस्रावधि घरांतून

प्रकाश दिसूं लागला म्हणजे अज्ञानी माणसाची चटकन् खात्री पटते. जगन्नाथरावांच्या अंगचे गुण डोळयांत न भरणारे आहेत. प्रसंगाशिवाय त्यांची खरी योग्यता कळणार नाहीं. उथळ पाण्याला खळखळाट असतो. पाण्याची खोली अधिक असली तर प्रवाह शांत असतो. जगन्नाथरावांचा जीवनप्रवाह असाच शांत आहे. स्वतःचें जीवन देशाला वाहिल्यामुळें त्यांचें मन तृप्त आहे. स्वतः म्हणून पुढें सरावें आणि कांहींतरी कार्य करीत रहावें हें त्यांच्या स्वभावांतच नाहीं. पण जें कार्य ते अंगावर घेतलि तें प्रामाणिकपणें करतील. जनतेला जगन्नाथरात्र हवे असले तर जनतेनेंच त्यांना हांक दिली पाहिजे.

लहानपणीं जगन्नाथरावांचा स्वभाव फार कोपिष्ट होता. वाढत्या वया-बरोबर त्यांनीं आपल्या रागाला विवेकाचा लगाम घातला. त्यांचा जाणून बुजून अपमान करण्याची एखाद्याला दुर्बुद्धि सुचली तरच त्यांच्या कोपिष्ट स्वभावचें रुद्रदर्शन होईल. नपेक्षां त्यांच्या गोड आतिथ्याचा अनुभवच तुम्ही घेऊं शकाल.

पहिल्या प्रतीच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांशीं वागतांना त्यांची वागणूक बरो-बरीची असते. खास निमंत्रण आल्याखेरीज ते कोणाला भेटायला जाणार नाहींत. सरदार पटेल अगर पंडीत नेहेरू यांचें चौपाटीवर जाहिर व्याख्यान असलें तरी अशा सभांना ते हजर आहेत असे दाखवितां येणार नाहीं. मोठ्या लोकांशीं वागतांना जेवढ्यास तेवढें वागणारे जगन्नाथराव सामान्य माणसांत चटकन मिसळतात. विशेषतः मुलांशीं वागतांना ते स्वतःचा मोठेपणा विसरून जातात. आठवण झाली म्हणून सांगतों. हल्लींचीच हकिगत आहे. दुपारीं दोन वाजण्याचा सुमार होता. जगन्नाथराव सरदार पटेलांना भेटण्यासाठीं बाहेर निघायचे होते. इतक्यांत आठदहा मुलांची एक टोळी जगन्नाथरावांचा तपास करीत खोलींत घुसली. जनरल साहेबांचा फोटो काढण्यासाठीं हे

बालवीर मुद्दाम आले होते. कुठें दादर आणि कुठें मरीनड्राईव्ह. आतां वेळ नाहीं असें जगन्नाथराव म्हणतील अशी माझी कल्पना होती. परंतु ते म्हणाले "फार जरूरीचं काम आहे. लौकर आटपा."

झालं निरनिराळ्या पोझचे मनासारखे फोटो घ्यायला अर्धा तास केव्हांच संपला आणि तीं मुलें आनंदी मनानें घरीं परतलीं.

त्यांच्या साहसी स्वभावाचीं अनेक उदाहरणें त्यांच्या चरित्रांत आढळतात. एका युरोपियन जोडप्याला वांचविण्यासाठीं त्यांनी समुद्रांत उडी टाकली हें त्यांपैकीं एक उदाहरण आहे. परंतु वास्तविक पाहतां दुर्दम्य आत्मविश्वास आणि क्षणांत निर्णय घेण्याची मानसिक तयारी यांच्यामुळें ते ज्या गोष्टी सहज करूं शकतात त्यालाच लोक साहसी म्हणून संबोधतात. त्यांच्या स्वभावांत अविचारांतून उत्पन्न होणारें साहस नसून विचारांतून व आत्मविश्वासांतून प्रगट होणारा पराक्रम आहे. इतरांना अशक्य असेल असें कार्य अंगावर घेण्यांत त्यांना आनंद वाटतो असें दिसतें.

पूर्व आशिया आणि जपानमधील लोक हिज एक्सलन्सी जनरल भोंसले असा त्यांचा उल्लेख करतात. नेताजींच्या हाताखालचा इतरांप्रमाणें एक अधिकारी अशा स्वरूपाची त्यांची कामगिरी नसून आझाद हिंद सेनेच्या इतिहासांत त्यांचें स्थान अगदीं स्वतंत्र व मानाचें आहे. शिस्त बिघडून गेलेल्या आणि सूडबुद्धीनें बेफाम झालेल्या सैनिकांना शिस्त लावून माणसांत आणण्याचें सर्व श्रेय जगन्नाथरावांना दिलें जातें. सुप्रीम कमांड नेताजींच्या स्वाधीन करून, ज्या ठिकाणीं त्यांनीं सर्वाधिकारी म्हणून काम केलें त्याच ठिकाणीं त्याहून खालची जागा स्वीकारून, एक नवें उदाहरण त्यांनीं जगाला घालून दिलें. जगन्नाथराव दर्जापेक्षां कार्याकडे पाहतात. पायापासून कळसापर्यंत नेताजींचें स्वप्न साकार करूं पाहाणारा खंदा सेनानी आणि सच्चा राष्ट्रभक्त म्हणून त्यांना ओळखलें जातें. पूर्व आशियांतील हिंदी जनतेंत राष्ट्राभिमान व चैतन्य निर्माण

करण्याचें श्रेय नेताजींना असून, त्यांना उत्तम शिस्त आणि लष्करी शिक्षण देऊन देशकार्यासाठीं त्यांचा उपयोग करून घेण्याचें श्रेय जगन्नाथरावांकडे जातें. आम्हाला देशासाठीं कांहींतरी करण्याची इच्छा आहे असें कंठशोष करून सांगणाऱ्या आजच्या तरुण वर्गाला कामाला कसें लावावें हेंच आमच्या पुढाऱ्यांना समजत नाहीं. हें पाहिलें म्हणजे जनशक्तीला कामाला जुंपणें हें किती महान कार्य आहे तें लक्षांत येईल. अगदीं अल्पावधींत सात हजार पांचशें लोकांना खास शिक्षण देऊन त्यांनीं अधिकारी वर्ग तयार केला. राणी ऑफ झांशी, बालसेना आणि आझाद् हिंद् सेना धरून एकूण तीन लक्ष लोकांची शिस्तबद्ध संघटना अवघ्या आठ महिन्यांत तयार करण्याचें विराटकार्य त्यांनीं पार पाडलें. ह्या सर्व गोष्टी करतांना आघाडी आणि पिछाडीकडील प्रश्नांनाहि तोंड द्यावें लागत होतें हें लक्षांत घेतलें म्हणजे सेनापति म्हणून त्यांची बरोबरी करणारा एक तरी अधिकारी आज हिंदुस्थानांत आढळेल काय असा प्रश्न पडतो. युरोपियन लष्करी अधिकाऱ्यांना त्यांच्या खऱ्या योग्यतेची पूर्ण कल्पना आहे असें वाटतें.थोड्याच दिवसांपूर्वीं इंग्लंडमधिल एका दैनिकांत एका लष्करी अधिकाऱ्याचा लेख प्रसिद्ध झाला होता. त्यांत सुभाषचंद्र बोस हे अपघातानें वारले हें खरें असलें तरीसुद्धां संधि मिळाल्यास ब्रिटिशांशीं दोन हात खेळू शकतील असे कर्तबगार अधिकारी आझाद् हिंद् फौजेंत आज आहेत असें त्यानें म्हटलें होतें.

विजय असो अगर पराजय असो, सैनिकांच्या सुखदुःखांत वांटेकरी होण्यासाठीं नेहमीं तत्पर राहिलेला हा महाराष्ट्रीय सेनानी महाराष्ट्राला नेहेमीच प्रिय राहील. उत्कृष्ट संघटनकौशल्य, जबर आशावाद, निष्कपट व दिलदार स्वभाव, लष्करी डावपेंचांतील प्राविण्य, देशहिताची तळमळ ह्या गुणांनीं कांठोकांठ भरलेला असा त्यांचा जीवनप्रवाह आहे.

★

जय हिन्द प्रकाश माला

१९४८ चें. कॅलेंडर

# साने गुरुजींचीं बारा पुस्तकें

★  ★

[ १ ] गुरुजींच्या गोष्टी
[ २ ] गुरुजींचे संवाद
[ ३ ] गुरुजींचीं चरित्रें
[ ४ ] गुरुजींचीं कीर्तनें
[ ५ ] गुरुजींचीं प्रवासवर्णनें
[ ६ ] गुरुजींचे अनुवाद
[ ७ ] गुरुजींचीं व्याख्यानें
[ ८ ] गुरुजींचे निबंध
[ ९ ] गुरुजींच्या कविता
[१०] गुरुजींचीं प्रश्नोत्तरें
[११] गुरुजींचीं पत्रें
[१२] गुरुजींचे विचार

आ क र्ष क ति रं गी मु ख पृ ष्ठ
मू ल्य प्र त्ये कीं चा र आ णे
वा र्षि क व र्ग णी ती न रु प ये

जय हिन्द प्रकाशमालेचीं हीं सर्व पुस्तकें हिंदुस्थानांतील प्रत्येक बुकसेलरकडे मिळण्याची व्यवस्था केलेली आहे. तथापि आपल्या गांवांतील पुस्तकविक्रेत्याकडे तीं न मिळाल्यास लिहा—

**जय हिन्द प्रकाशन : झावबाची वाडी : मुंबई २**

# प्रश्न आठ ? पण उत्तर—एकच !

## आजीबाईचा बटवा ! ! !

[ लेखक—डॉ० रामभाऊ भोगे, अमळनेर ]

१ तुम्हाला मूल हवें आहे काय ?

२ तुमच्या घरीं विटाळाची तक्रार आहे काय ?

३ तुमचीं मुलें नेहेमीं आजारी असतात काय ?

४ तुम्हाला डॉक्टर किंवा वैद्याचें बील नकोसें झालें आहे काय ?

५ तुमच्या घरांतील आजारपणानें तुम्ही संत्रस्त आहात काय ?

६ तुमच्या गांवांत प्रसूति-गृहाची उणीव आहे काय ?

७ तुमच्या मुलीला सासरीं पाठवतांना बरोबर काय द्याल ?

८ डॉक्टरला किंवा वैद्याला घरीं बोलावण्यापूर्वीं काय कराल ?

हे प्रश्न आठ आहेत, पण त्यांचें उत्तर एकच आहे !

## आजीबाईचा बटवा उघडा !

वाचा ! विचार करा ! ! उपचार करा ! !


आणि सुखी व्हा ! !


आजीबाईच्या बटव्यांत सर्वसामान्य रोगांवर सुलभ, अनुभविक व हमखास गुणकारी असे उपचार तुम्हाला सांपडतील.

## किंमत फक्त चार आणे

जय हिंद प्रकाशन : झावबाची वाडी : मुंबई २

गोजिरीं गोजिरीं
मुलें
★ ★
सेनापति भोंसले
यांच्या सुकन्या





लेखक

गुं. फ. आजगांवकर

# जयहिन्द प्रकाशमाला

संपादक : गजानन काशीनाथ रायकर

राष्ट्रीय भावना उद्दीपित करणारें चार आणे किंमतीचें एक पुस्तक, या मालेंतून दरमहा प्रसिद्ध होत असतें. हिंदुस्थानांतील सर्व भागांत या मालेच्या पुस्तकांचा खप फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. वार्षिक वर्गणी तीन रुपये. आपल्या गांवांतील बुकसेलरकडे ह्या पुस्तकांची मागणी करा.

— नवीन पुष्प —

रोमहर्षक व चित्तवृत्ति थरारून सोडणारी कादंबरी

## दंग्याच्या रात्रीं

लेखक : स. ना. सूर्यवंशी

तिरंगी मोहक मुखपृष्ठ : आकर्षक सजावट

जयहिंद प्रकाशन

ठाकुरद्वार : झावबाची वाडी : मुंबई २

मुखपृष्ठ छपाई : हिंद प्रिंटिंग वर्क्स : मुंबई ४